MHRG080018942025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १५८/२०२५.**

रश्मी रविंद्र टिळक **विरूध्द** सरकार / खोपोली पोलीस स्टेशन

## निशाणी क्र.१ वरील आदेश.

सदरचा अर्ज अर्जदार यांनी **''भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३''** अन्वये अर्जदार यांच्या सेंट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली, बॅक ऑफ इंडिया शाखा खोपोली, कोकण मर्कटाईल शाखा खोपोली, या खात्यामधून जी पे द्वारे व आर.टी.जी.एस. द्वारे ऑनलाईन सायबर फसवणूक दरम्यान वळती झालेली रक्कम तपासकामी पोलिसांनी गोठवून ठेवलेली असून सदर बॅक खात्यामध्ये गोठविलेली रक्कम अर्जदार यांना परत मिळयाण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे आहे की, त्या लक्ष्मीनगर खोपोली ता. खालापूर, जि. रायगड येथील रहिवाशी असून सदर गुन्हयाच्याकामी त्यांच्या मालकीची रक्कम त्यांच्या मोबाईल हॅक करुन सायबर क्राईम करुन त्यांची फसवणूक करून पैसे अकाउंटमधून चोरलेले आहेत. त्याकामी खोपोली सी.आर.४७/२०२५ ही फिर्याद खोपोली पोलिस स्टेशन येथे दाखल केलेली आहे. दिनांक ०८/०१/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६४०१९४७८ यावर अनोळखी मोबाईल क्रमांकाने कॉल येवून त्याने त्यांना तुमच्या क्रेडीट कार्डने तीन कोटीचे ड्रग्ज घेतलेले आहे असे सांगितले. तुमचे आधारकार्ड कोणीतरी तुमच्या क्रेडीट कार्ड सोबत लिंक केलेले आहे. एवढे ड्रग्ज तुमच्याकडे सापडले तर तुम्हाला जेलमध्ये अनेक दिवस जावे लागेल आणि तुम्हाला वॉरंट काढले आहे असे सांगितल्यावर त्या घाबरल्या व याच्यावर उपाय काय आहे का असे विचारले असता, तो म्हणाला त्यासाठी तुम्हाला थोडे पैसे द्यावे लागतील तर त्या म्हणाल्या की, जर मी निर्दोष आहे तर तुम्हाला का पैसे देवू त्यावर तो म्हणाला की, ते सिध्द होण्यासाठी आम्हाला खर्च करावा लागेल आणि तुम्ही निर्दोष असाल तर तुम्हाला सर्व पैसे परत मिळतील त्यानंतर त्यांना

त्यांचा व्हॉस्टअप मोबाईल नंबर ८३२९८५१८९८ या नंबरवर वेळोवेळी ८९६८६१९२६९ या व्हॅाटअप नंबर वरुन जे अकाउंट नंबर आले त्यावर अर्जदार यांनी वेळोवेळी खालील प्रमाणे पैसे पाठविले.

१. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून जी पे द्वारे रुपये ४९,९९९/– पाठविले.

२. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून जी पे द्वारे रुपये ३०,०००/– पाठविले.

३. बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून एन.ई.एफ.टी.द्वारे रुपये १२,५०,०००/– पाठविले.

४. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून जी पे द्वारे रुपये ४९,९९९/– पाठविले.

५. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून जी पे द्वारे रुपये २०,०००/– पाठविले.

६. बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून आर.टी.जी.एस. द्वारे रुपये ५,५०,०००/– पाठविले.

७. कोकण मर्कटाईल शाखा खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून आर.टी.जी.एस. द्वारे रुपये ४,९०,०००/– पाठविले.

८. कोकण मर्कटाईल शाखा खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून आर.टी.जी.एस. द्वारे रुपये ४,९०,०००/– पाठविले.

९. बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून आर.टी.जी.एस. द्वारे रुपये ४,१०,०००/– पाठविले.

१०. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून एन.ई.एफ.टी. द्वारे रुपये १,७०,०००/– पाठविले.

११. सेट्रल बॅक ऑफ इंडीया खोपोली या अर्जदार यांच्या नावावर असलेल्या बॅक खात्यातून आर.टी.जी.एस. द्वारे रुपये ५,००,०००/– पाठविले. असे एकुण

४५,०९,९९८/- रुपये त्यांच्या वेगवेगळया बॅकेच्या अकाउंटमधून त्यांना पाठविण्यास भाग पाडण्यात आले. तरी पोलिस तपासात परत आलेली जी काही रक्कम असेल ती परत देण्याचा हुकूम व्हावा.

३. सदर अर्जावर सरकारी वकील व तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, खोपोली पोलिस ठाणे येथे प्राप्त अर्ज क्र.१५८/२०२५ मधील अर्जदार रश्मी टिळक यांनी स्वतःच्या अकाउंटमधून गुगल पे, आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. सदर्भात फसवणूनक झाल्याबाबत एन.सी.आर.बी. पोर्टल अर्ज क्र.३१९०२२५००२६४७५ अन्वये तक्रार दिलेली आहे. तसेच खोपोली पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.४७/२०२५ हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर अर्जाच्या चौकशी वरुन तसेच एन.सी.आर.बी. पोर्टल वरुन फिर्यादी यांच्या अकाउंटमधून डेबीट झालेली रक्कम ही खालील प्रमाणे,

१. अर्जदार यांच्या बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून किशनलाल साताराम यांचे बंधन बॅक शाखा बापू नगर, अहमदाबाद, त्याचा अकाउंट क्र. २०२०००७७९८९२४३, त्याचा IFCS Code BDBL0002697 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ४,१०,०००/- एवढी रक्कम दिनांक ३१/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.
२. अर्जदार यांच्या बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून दरबार ऑनलाईन ॲण्ड ग्राहक सेवा केंद्र यांचे एच.डी.एफ.सी.बॅक शाखा सिओनी मालवा, मध्यप्रदेश त्याचा अकाउंट क्र. ५०२०००९७८५०५४१, त्याचा IFCS Code HDFC0002143 यांच्या खात्यावर रक्कम रुपये १२,५०,०००/- एवढी रक्कम दिनांक १०/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

३. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून सोलंकी प्रदिपसिंग जोरुभाई यांचे पंजाब नॅशनल बॅक शाखा तारापूर त्याचा अकाउंट क्र. ९२३८०००१००००२४९२, त्याचा IFCS Code PUNB0923800 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ०१,७०,०००/– एवढी रक्कम दिनांक ०१/०२/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

४. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून निकुलसिंग सोलंकी यांचे पंजाब नॅशनल बॅक शाखा तारापूर त्याचा अकाउंट क्र. ९३३८०००१०००२०९५५, त्याचा IFCS Code PUNB0923800 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ०५,००,०००/– एवढी रक्कम दिनांक ०६/०२/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

५. अर्जदार यांच्या बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून शिवचरण यांचे  यांचे फेडरल बॅक शाखा वाशी, नवी मुंबई त्याचा अकाउंट क्र. १३६९०१००१७२७७७, त्याचा IFCS Code FDRL0001369 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ०५,५०,०००/– एवढी रक्कम दिनांक १५/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

६. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून मनोज कारवा यांचे एच.डी.एफ.सी. बॅक शाखा पुचामन, शहर राजस्थान त्याचा अकाउंट क्र. ५०१००७६६३८४४९४, त्याचा IFCS Code HDFC0004272 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ४९,९९९/– एवढी रक्कम दिनांक ०८/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

७. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून मनोज कारवा यांचे एच.डी.एफ.सी. बॅक शाखा पुचामन, शहर राजस्थान त्याचा अकाउंट क्र. ५०१००७६६३८४४९४, त्याचा IFCS Code HDFC0004272 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ३०,०००/- एवढी रक्कम दिनांक ०८/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

८. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून आशिस चौधरी यांचे कॅनरा बॅक शाखा १९३९४ लालगंज, २२९२०७ उत्तर प्रदेश त्याचा अकाउंट क्र. ११०२१५२१२०३१, त्याचा IFCS Code CNRB0000033 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ४९,९९९/- एवढी रक्कम दिनांक ०८/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

९. अर्जदार यांच्या सेट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून आशिस चौधरी यांचे कॅनरा बॅक शाखा १९३९४ लालगंज, २२९२०७ उत्तर प्रदेश त्याचा अकाउंट क्र. ११०२१५२१२०३१, त्याचा IFCS Code CNRB0000033 यांच्या खात्यावर रक्कम रुपये २०,०००/- एवढी रक्कम दिनांक १४/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्याप्रमाणे सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी सदर रक्कमेवर लिनमार्क लावलेला आहे.

४. वर नमूद अर्जदार यांचे वरील प्रमाणे एकुण ९ वेगवेगळया बॅकेमध्ये ३०,२९,९९८/- रुपयांचे ट्रान्झॅक्शन झालेले असून त्यापैकी अ.क्र.१ कडील अर्जदार यांच्या बॅक ऑफ इंडीया शाखा खोपोली या बॅकेच्या अकाउंटमधून किशनलाल साताराम यांचे बंधन बॅक शाखा बापू नगर, अहमदाबाद, त्याचा अकाउंट क्र. २०२०००७७९८९२४३, त्याचा IFCS Code BDBL0002697 यांच्या खात्यावर रक्कम रुपये ४,१०,०००/- एवढी रक्कम दिनांक ३१/०१/२०२५ रोजी क्रेडीट झालेली आहे. त्यापैकी सध्या स्थितीत

वर नमूद खात्यावर एकुण २,८९,४४५/– रुपये इतकी रक्कम होल्ड करण्यात आलेली असून सदर बॅक खाते हे एन.सी.आर.बी. पोर्टल यांनी नमूद रक्कमेवर लिन मार्क लावलेला आहे. तरी सदर अर्जदार यांच्या फसवणूक झालेल्या रक्कम पैकी, २,८९,४४५/– एवढी रक्कम अर्जदार यांना परत देण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत.

५. सरकारी वकीलांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी मागणी केलेली रक्कम ही सायबर क्राईम या गुन्हयात अर्जदार यांच्या खात्यातून ज्या बॅक खात्यामध्ये पैसे वळते झालेले आहेत ती बॅक खाती पोलिसांनी तपासादरम्यान गोठविलेली आहेत. त्यामुळे अर्जात नमूद असलेली रक्कम ही केसच्या पुराव्याकामी महत्वाची ठरणार आहे. सदरची रक्कम ही अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास ते सदरची रक्कम केसच्या सुनावणी कामी प्रत्येक तारखेस न्यायालयास हजर ठेवतील याची शासवती देता येणार नाही. सदरची रक्कम अर्जदार यांना ताब्यात दिल्यास ते सदरची रक्कम खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा पुराव्यावर देखील विपरित परीणाम होईल त्यामुळे अर्ज ना मंजूर करण्यात यावा.

६. अर्जदार तर्फे वकील व सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत निशाणी क्र.४ वरील कागदयादी प्रमाणे काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये अर्जदारने प्रथम खबर अहवाल क्र.४७/२०२५ ची झेरॉक्स प्रत, सर्व बॅक स्टेटमेंट, पासबुकची झेरॉक्स प्रत व आधार कार्ड पॅन कार्डची झेरॉक्स प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, तपासी अंमलदार यांनी सायबर क्राईम तक्रार क्र. ३१९०२२५००२६४७५ च्या चौकशी दरम्यान एकुण रक्कम रुपये ०२,८९,४४५/– ही गोठविलेली आहे. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे म्हणले आहे की, सदरची रक्कम ही होल्ड झालेली असून त्या सर्व खात्यांचे ट्रन्झाक्शन बंद करण्यात आलेले आहे. सदरच्या रक्कमेवर मालकी हक्क दाखविण्यासाठी अर्जदार यांनी अर्जासोबत त्यांचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रथम खबर अहवालाच्या प्रतीचे अवलोकन केले असता,

त्यामध्ये देखील अर्जदार यांच्या वेगवेगळया बॅक खात्यामधून एकुण रक्कम रुपये ४५,०९,९९८/– जी पे, आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. द्वारे वजा झाली असल्याचे नमूद आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी दाखल केलेल्या बॅक स्टेटमेंटचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यांच्या सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा खोपोली या बॅकेतील खाते क्र. ३२४५८८०३२५ या खात्यावरुन दिनांक ०८/०१/२०२५ रोजी ४९,९९९/– व ३०,०००/– तसेच दिनांक ०१/०२/२०२५ रोजी रक्कम रुपये १,७०,०००/–, दिनांक ०६/०२/२०२५ रोजी रक्कम रुपये ५,००,०००/–, दिनांक १४/०१/२०२५ रोजी रक्कम रुपये ४९,९९९/– व २०,०००/– वजा झाल्याचे दिसून येते. त्यांच प्रमाणे अर्जदार यांच्या बॅक ऑफ इंडया शाखा खोपोली येथील खात्यावरुन दिनांक १०/०१/२०२५ रोजी १२,५०,०००/–, दिनांक १५/०१/२०२५ रोजी ५,५०,०००/– व दिनांक ३१/०१/२०२५ रोजी ४,१०,०००/– वजा झाल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे अर्जदा यांच्या कोणन मर्चंटाईल शाखा खोपोली या बॅकेमधून दिनांक १६/०१/२०२५ रोजी रक्कम रुपये ४,९०,०००/– दिनांक २०/०१/२०२५ रोजी ४,९०,०००/– वजा झाल्याचे दिसून येते. सदरची रक्कम अर्जदार यांना परत देण्यास तपासी अंमलदार यांनी कोणतीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार हया सदर रकमेच्या मालक असल्याचे दिसून येते. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त सदर रक्कमेची आजपर्यंत कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हया सदरची रक्कम परत मिळण्यास पात्र आहेत. तपासी अंमलदार यांनी या गुन्हयामध्ये एकुण रक्कम रुपये २,८९,४४५/– इतकी रक्कम गोठविलेली आहे. सदर रक्कम गोठविलेली असल्यामुळे तिचा वापर अर्जदार यांना करता येत नाही. अश्या परिस्थितीमध्ये सदरची रक्कम अर्जदार यांना परत न दिल्यास अर्जदार यांचे नुकसान होईल सदरची रक्कम वर नमूद बॅक खात्यामध्ये दिर्घकाळा पर्यंत गोठवून ठेवल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. त्यामुळे सदरची रक्कम अर्जदार यांना सुपुर्तनाम्यावर तात्पुरत्या स्वरुपात अटिशर्तीवर अर्जदारास परत देणे योग्य होईल. सदरची रक्कम आवश्यक्ता भासल्यास अर्जदार यांनी खर्च करण्यास त्यांना परवानगी देण्यात येत आहे. परंतु भविष्यात सदरची रक्कम अर्जदार यांची नाही, या निष्कर्षा पर्यंत न्यायालय आल्यास ती रक्कम

न्यायालयात जमा करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. सदर रक्कम अर्जदारास परत दिल्यास सरकारी पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खोपोली पोलिस स्टेशन यांच्याकडील सायबर क्राईम क्र. ३१९०२२५००२६४७५ मध्ये तपासी अंमलदार यांनी गोठविलेली रक्कम रुपये २,८९,४४५/- ही अर्जदार रशमी रविंद्र टिळक यांना रक्कम रुपये २,८९,४४५/- रक्कमेचा सुपूर्तनामा बॉड लिहून दिल्यानंतर त्यांना खालील अटींचे आधीन राहून सदर रकमेचा ताबा देण्यात यावा.

३. सदर रक्कम ही अर्जदार रशमी रविंद्र टिळक यांच्या बॅक ऑफ इंडिया शाखा खोपोली, येथील खाते क्र. १२०९१०१०००१८५८८ या खात्यामध्ये परत करण्यात यावी.

४. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये २,८९,४४५/- ही किशनलाल साताराम यांचे बंधन बॅक शाखा बापूनगर, अहमदाबाब याचे खाते क्र.२०२०००७७९८९२४३, IFCS Code BDBL0002697, पत्ता - तळ मजला, डि मार्ट जवळ, रघुनाथ हायस्कूलच्या समोर बापू नगर, अहमदाबाद या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये २,८९,४४५/- ही अर्जदारास परत करावी.

५. तपासी अंमलदार यांनी उपरोक्त नमुद मुद्देमाल सुपूर्त नाम्यावर सोडण्यापुर्वी त्या बाबतचा सविस्तर पंचनामा करावा.

६. उपरोक्त मुद्देमालाचा वापर अर्जदार यांनी कोणताही गुन्हा करण्याकरीता करु नये, तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाचा केलेला पंचनामा व सुपूर्तनामा बॉड दोषारोप पत्रासोबत दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.13 16:28:43 +0530

(**डी.एस. खोत** )

स्थळ – खालापूर.

दिनांक – १३/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.२, खालापूर.